**<u>वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका १९७८, भाग-२, मराठी भाषा आणि साहित्य विषयक उपक्रमांचे आयोजन त्याचप्रमाणे राज्य वाड्.मयीन पुरस्कार समारंभाचे आयोजन इत्यादी साठीचा खर्च संक्षिप्त देयकावर आहरित करण्यासाठी प्रशासकीय विभागास वित्तीयअधिकार प्रदान करण्याबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**
**मराठी भाषा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संक्षिप्त-२०१७/प्र.क्र.३५/२०१७/भाषा-३,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**तारीख: २७ ऑक्टोबर, २०१७.**

**<u>वाचा</u> :-** वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, दिनांक १७एप्रिल,२०१५.

**<u>प्रस्तावना</u> :-**

मराठी भाषा विभाग (खुद्द) व विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालयांकडून मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्याच्या अनुषंगाने राबविण्यात येणारे विविध उपक्रम आणि राज्य वाड्.मयीन पुरस्कार समारंभाचे प्रती वर्षी आयोजन करण्यात येते. सदर उपक्रम / समारंभाचे पूर्वनियोजन करण्यासाठी संक्षिप्त देयकाद्वारे रक्कम आहरित करण्यासाठी वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-२ अंतर्गत प्रशासकीय विभागास वित्तीय अधिकार प्रदान करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**<u>शासन निर्णय</u> :-**

या शासन निर्णयान्वये, मराठी भाषा विभाग (खुद्द) व विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालयांकडून मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्याच्या अनुषंगाने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे आयोजन व राज्य वाड्.मय पुरस्कार समारंभाचे पूर्वनियोजन करण्यासाठीचा खर्च भागविण्यासाठी संक्षिप्त देयकाव्दारे रक्कम आहरित करण्यासाठी प्रशासकीय विभाग प्रमूख यांना खालील प्रमाणे वित्तीय अधिकार प्रदान करण्याची मंजूरी देण्यात येत आहे.

भाग-२

| अ. क्र. | नवीन शक्तीचे वर्णन | अधिकाराचा वापर करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी | प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार | अटी |
|---|---|---|---|---|
| १. | मराठी भाषा आणि साहित्य विषयक कार्यक्रमांचे आयोजन | प्रशासकीय विभाग | वार्षिक रु.१०.०० लक्ष च्या मर्यादेपर्यंत | (१) खर्चाला मंजूरी देण्यासंबंधीचे अधिकार वित्तीय प्राधिकाऱ्यांना असले तरच |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | त्याचप्रमाणे राज्य वाड.मयीन पुरस्कार समारंभाचे आयोजन इत्यादी खर्चाची रक्कम संक्षिप्त देयकाद्वारे आहरित करण्यास मंजूरी देणे. | | | संक्षिप्त देयकावर रक्कम काढता येईल.<br>(२) खर्च मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.<br>(३) या वित्तीय शक्तीचा वापर करुन वेतन व भत्ते याकरिता संक्षिप्त देयके सादर करता येणार नाहीत.<br>(४) काटकसरीच्या आदेशांचे अनुपालन करण्यात यावे.<br>(५) कोणत्याही परिस्थितीत संबंधित कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडे सहा महिन्यापूर्वी काढलेल्या एकाही संक्षिप्त देयकाचे तपशिलवार देयक लेखा परीक्षकांना सादर करण्याचे प्रलंबित असू नये.<br>(६) संक्षिप्त देयकावर रक्कम काढण्यासाठी कार्यालयाकडून ज्ञापन/आदेश काढण्यात यावा व त्यामध्ये ज्या बाबींसाठी रक्कम काढावयाची आहे, त्यामध्ये पुढील बाबींचा उल्लेख करण्यात यावा.<br>अ) या कार्यालयाकडे एकही संक्षिप्त देयकाचे तपशिलवार देयक लेखा परीक्षकांना सादर करण्याचे प्रलंबित नाही.<br>ब) या ज्ञापनान्वये काढण्यात येणाऱ्या संक्षिप्त देयकाचे तपशिलवार देयक विहित कालावधीत सादर करण्यात येईल.<br>क) संक्षिप्त देयकाचे तपशिलवार देयक सादर करण्यास जबाबदार असलेल्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | संबंधित अधिकाऱ्याचे (उदा.आहरण व संवितरण अथवा अन्य) पदनाम विहित करावे.<br>ड) खर्च संक्षिप्त देयकाव्दारे करणे अनिवार्य आहे.<br>(७) मंजुरी प्राधिकाऱ्याला सदर खर्चाच्या बाबींसाठी प्राप्त झालेल्या वित्तीय शक्तीचा उल्लेख मंजुरी ज्ञापनात / आदेशात करण्यात यावा, जसे "वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला, उप विभाग - (क्रमांक लिहिणे), अनुक्रमांक - (क्रमांक लिहिणे), नियम / परिच्छेद क्रमांक (नियमपुस्तिकेच्या नावासह लिहिणे) (शा.नि.-- विभाग, क्रमांक --, दिनांक -- लिहिणे)"<br>(८) संक्षिप्त देयकावर काढलेल्या रक्कमेतून खरेदी करावयाची असल्यास तत्संबंधीची पूर्व तयारी केलेली असावी, (उदा.निविदा, करारपत्रे अंतिम करणे इत्यादी.)<br>(९) या शक्ती समोरील इतर अटी व्यतिरिक्त संक्षिप्त देयकावर रक्कम काढण्याची विहित कार्यपध्दती तशीच राहील.<br>(१०) सदर वित्तीय शक्ती करिता वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील वित्तीय अधिकार विभागास वापरता येणार नाहीत. |

२. सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

३. प्रस्तुत प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार अर्थसंकल्पीय अनुदानाच्या उपलब्धतेच्या अधीन राहतील.

४. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभागाच्या क्र.२६३/विनियम/दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ च्या अनौपचारिक संदर्भान्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०२७१४१५५२४९३३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Uday Ganpat Gawas

Digitally signed by Uday Ganpat Gawas
DN: CN = Uday Ganpat Gawas, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Marathi Language
Date: 2017.10.27 16:22:06 +05'30'

**( उदय ग. गवस)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
२. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
५. मा.विरोधी पक्ष नेता (विधान परिषद / विधान सभा) यांचे स्वीय सहाय्यक,
६. सर्व विधान सभा / विधान परिषद सदस्य यांचे स्वीय सहाय्यक,
७. वित्त विभाग, व्यय-४ / विनियम, मंत्रालय, मुंबई,
८. प्रधान सचिव (मराठी भाषा विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
९. संचालक, भाषा संचालनालय,मुंबई,
१०. संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
११. सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,
१२. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
१३. अवर सचिव (भाषा / अर्थसंकल्प), मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. कक्ष अधिकारी (कार्यासन भाषा - १ / २ / ३), मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५. भाषा - ३ (संग्रहार्थ).